तमसो मा ज्योतिर्गमय

# भोरगांव लेवा पंचायत

मु. पाडळसे, तालुका-यावल,
जिल्हा जळगाव.

# घटना

( मूल्य । एक रुपया, पैसे पन्नास मात्र )

"तमसो मा ज्योतिर्गमय"

# भोरगाव लेवा पंचायत, मु. पाडळसे, तालुका यावल, जिल्हा जळगाव

भूमिका व उदिद्ष्टचे –

१) विशाल मानव समाजाचा आपण एक भाग ( घटक ) आहोत, ही भावना सतत डोळ्यासमोर ठेवून ही संस्था आपले कार्य करील.

२) सार्वभौम प्रजासत्ताक भारताच्या घटनेने प्रत्येक नागरिकास दिलेले हक्क (स्वातंत्र्य, बंधुभाव व समता विशेषतः स्त्री पुरूषांच्या मधील समता ) व त्या अनुषंगाने येणाऱ्या जबाबदाऱ्या लक्षात घेऊन ही संस्था आपले कार्यक्रम तयार करील.

३) या संस्थेद्वारे चालविण्यात येणारी चळवळ ही व्यक्ती – व्यक्तींच्या उद्धारातून अर्थात आत्मोध्दारातून समाजोद्धार साधणारी चळवळ असेल. संस्थेचे सर्व कार्यक्रम ह्या तत्वाला अनुरूप असेच असतील व म्हणून हे साध्य करण्याच्या मार्गात बाधक ठरणाऱ्या सर्व प्रकारच्या संकुचित विचारापासून अलिप्त राहू व ही संस्था आपले कार्य करील. समाजातील, विशेषतः युवा वर्गातील सत्व व स्वत्व जागृत करून एका बाजूने समाजाला अधःपाताकडे नेणाऱ्या दुष्ट रुढी, परंपरा, विषमता इ. अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा प्रयत्न करीत असतांना दुसऱ्या बाजूने युवा वर्गास कालानुरूप योग्य दिशा देण्यासाठी प्रभावी उपाय योजना करील व तदनुरूप कार्यक्रम घेईल.

वरील भूमिकेला अनुसरून समाजाचे कार्य संघटित करण्याकरिता, आज तारीख १८–३–१९८४ रोजी पाडळसे मुक्कामी समस्त लेवा समाजाच्या सर्व साधारण सभेमध्ये आम्ही खालीलप्रमाणे घटना स्वीकारीत आहोत. घटना येणे प्रमाणे –

## १ . संस्थेचे नाव :

लेवा समाजाच्या सदर संस्थेचे नांव " भोरगांव लेवा पंचायत, मु. पाडळसे, ता. यावल, जिल्हा जळगाव " असे राहील.

## २ . संस्थेचे मुख्य ठिकाण व कार्यालय :

संस्थेचे मुख्य ठिकाण व कार्यालय मु. पाडळसे, ता. यावल, जि. जळगाव येथे राहील.

## ३ . संस्थेची नोंदणी :

संस्थेची नोंदणी सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट प्रमाणे केली जाईल.

## ४. पंचायतीचे निगमन

सदर संस्था " भोरगांव लेवा पंचायत, मु. पाडळसे " अशा नावाने संबोधली जाऊन, तिची परंपरा अखंड असेल व तिची एक सामान्य मुद्रा असेल, तिला जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा व धारण करण्याचा अधिकार असेल. संस्थेला वरील नावाने दावा लावता येईल. तसेच त्या नावाने तिच्यावर दावा लावता येईल.

## ५. पंचायतीचे कामकाज वर्ष

प्रत्येक इसवी सनाचे को–ऑपरेटिव्ह वर्ष १ जानेवारी ते ३१ डिसेंबर हे पंचायतीच्या कामकाजाचे वर्ष राहील.

६. संस्थेची मिळकत ।

१) पूर्वापार पासूनच्या " गोरगाव लेवा पंचायत, मु. पाडळसे " या संस्थेची तारीख १८-३-१९८४ रोजी असलेली सर्व जंगम व स्थावर मिळकत.

२) क्रियाशील सभासदांकडून गाव पंच मंडळाकडे जमा झालेल्या वर्गणीची रक्कम

मात्र ह्या वर्गणीच्या रकमेपैकी फक्त शेकडा ४० टक्के रक्कम "गोरगाव लेवा पंचायतीकडे" अदा व्हावयाची असून बाकीची रक्कम ज्या त्या गांव पंच मंडळाकडे राहील. गांव पंच मंडळाकडे असलेल्या रकमेचा विनियोग करण्याचा संपूर्ण अधिकार संबंधित गांव पंच मंडळाला राहील.

३) देणगीरूपाने मिळालेली मिळकत.

४) आणि इतर अन्य मार्गाने मिळालेली मिळकत.

७ पंचायतीची रचना व स्वरुप :

अ) सामान्य सभासद :

पूर्वापार पासूनच्या खान्देश व बुलढाणा या मूळ परिसरातील ' लेवा पाटीदार, ' लेवा पाटील ' ' लेवा कुणबी' किंवा ' रेवा कुणबी ' ह्या नावाने ओळखले जाणारे मग ते वास्तव्याला कुठेही असो, त्यातील प्रत्येक प्रौढ स्त्री – पुरुषास या पंचायतीचा सामान्य सभासद समजले जाईल. ह्यात कंडारकर, साक्रीकर व नवघरे ह्या पोट जातीत जन्मलेल्या स्त्री पुरुषांचाही समावेश असेल. तसेच सदर समाजातील कोणाही स्त्रीने अगर पुरुषाने अन्य जातीतील व्यक्तीशी विवाह केल्यास, अशा विवाह संबंधातून जन्मलेले व वधात आलेले स्त्री–पुरुष हे सुध्दा त्या पंचायतीचे सभासद राहु शकतील.

ब) क्रियाशील सभासद

१) गोरगाव लेवा पंचायतीच्या भूमिकेवर श्रद्धा असलेला व सदर पंचायतीच्या ध्येय धोरणाच्या पूर्ततेसाठी कार्यरत असणाऱ्या कोणाही सामान्य सभासदास, ज्या गावात किंवा शहरात सर्व साधारणपणे त्याचा रहिवास असेल त्या गावाच्या किंवा शहराच्या गावपंचमंडळाकडे लेखी अर्ज करून व त्या वर्षाच्या ३१ डिसेंबरच्या आंत दरसाल रुपये रु१५वर्गणी भरून गावपंचमंडळाच्या संमतीने क्रियाशील सभासद होता येईल. मात्र दरसालचे दरसाल वर्गणी भरण्याऐवजी एकदम रुपये २५१ गाव पंच मंडळाकडे जमा केल्यास त्यास आजीव क्रियाशील सभासद होता येईल. मात्र अशा सभासदास सामान्य क्रियाशील सभासदांपेक्षा जास्त अधिकार नसतील.

२) क्रियाशील सभासद होण्याकरिता केलेला अर्ज स्वीकारण्याचा वा नाकारण्याचा अधिकार संबंधित लेवा गांव पंच मंडळाला राहील. अर्ज नाकारल्याचे अर्जदारास त्या बाबतीत समज मिळालेल्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आंत नियामक मंडळाकडे अपील करता येईल. सदर अपिलाबाबत नियामक मंडळाचा निकाल अखेरचा समजण्यात येईल.

३) कोणाही क्रियाशील सभासदाचे नैतिक अध:पतन झाल्याचे आढळून आल्यास अगर कोणाह क्रियशील सभासदाचे वर्तन समाज हितास बाध आणणारे असल्याचे नियामक मंडळास वाटल्यास, अशा सभासदाचे " क्रियाशील सभासदत्व " जास्तीतजास्त चार वर्षे पावेतो रद्द करण्याचा नियामक मंडळाला अधिकार राहील. अशा तऱ्हेने सदस्यत्व रद्द करण्याच्या निर्णय विरुध्द ज्याचे सभासदत्व रद्द केले गेले अशा सभासदास समज मिळालेल्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आंत महामंडळाकडे अपील करता येईल. सदर अपिलाबाबतचा निकाल अखेरचा समजला जाईल.

८) १) गोरगांव लेवा पंचायत, मु. पाडळसे ही संस्था लेवा समाजाची सर्वश्रेष्ठ अधिकार असलेली संस्था असेल.

२) सदर संस्थेची सर्व साधारण सभा दरसाल शक्यतो दरवर्षी जानेवारी महिन्या पर्यंतच्या सोयीच्या दिवशी मु. पाडळसे ता, यावल येथे अथवा नियामक मंडळ ठरविल अशा अन्य ठिकाणी घेतली जाईल. आवश्यकतेनुसार गावप्रमाणे शनिवारी सुरू होणारी सभा एकापेक्षा जास्त दिवस चालू ठेवता येईल

३) सर्वसाधारण सभेचे जाहीर निमंत्रण :

नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार अगर आदेशानुसार कुटुंब नायकांनी सर्वसाधारण सभा १५ दिवसांची पूर्व सूचना गांव पंच मंडळांस देऊन तसेच अगोदर वर्तमान पत्रात वा अन्य मार्गाने जाहीर करून व योग्य ती प्रसिद्धी देऊन संस्थेची सर्वसाधारण सभा बोलवावी.

४) पंचायतीची विशेष सर्वसाधारण सभा :

नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार व आदेशानुसार किंवा समाजातील २५० क्रियाशील कार्यकर्त्यांनी तशी विनंती केल्यास त्यानुसार काही तातडीच्या प्रश्नांबाबत विचार विनिमय करण्याकरिता, कुटुंब नायकांना योग्य अशा दिवशी, योग्य अशा वेळी व ठिकाणी सर्वसाधारण सभेप्रमाणेच सूचना व प्रसिद्धी देऊन पंचायतीची विशेष सभा बोलावता येईल.

५ पंचायतीचे सर्व साधारण सभेचे निर्णय व कामकाज :

ह्यासंबधी जनमताचा कल लक्षात घेण्यात येईल.

६) महामंडळाचे कार्याध्यक्ष हे कुटुंब नायकाच्या उपस्थितीत सर्वसाधारणसभेच्या व विशेष सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी राहतील. कार्याध्यक्षांच्या अनुपस्थितीत कुटुंब नायकांनी नामनिर्देशित केलेली व्यक्ती सभेच्या अध्यक्षस्थानी राहील.

७) भोरगांव लेवा पंचायतीच्या भूमिकेस अनुसरून चालणारे दैनंदिन कामकाज सदर घटनेत नमूद केलेल्या मंडळामार्फत व पदाधिकाऱ्यांच्या मार्फत होईल सदर मंडळे व पदाधिकारी यांच्या शिवाय आवश्यकता वाटल्यास आणखी ज्यादा मंडळे व पदे पंचायतीस गठित करता येतील व त्यांच्याकडील कामकाजाचे स्वरूप आणि जबाबदारी निश्चित करता येईल.

९. भोरगांव लेवा पंचायतीचे घटक :

१) कुटुंब नायक
२) लेवा पंचायत सल्लागार व निवड मंडळ
~~३) लेवा गाव पंच मंडळ~~
४) लेवा पंचायत महामंडळ
५) लेवा पंचायत नियामक मंडळ
६) लेवा पंचायत लवाद मंडळ
७) महिला मंडळ
८) युवक – युवती मंडळ
९) लेवा पंचायत विश्वस्त मंडळ

१) कुटुंब नायक।

भोरगाव लेवा पंचायतीचे कुटुंब नायक हे सर्व प्रमुख राहतील. तसेच ते पंचायत महामंडळ, नियामक मंडळ व विश्वस्त मंडळ यांचेही पदसिद्ध अध्यक्ष राहतील. ही प्रतिष्ठा त्यांना परंपरेनुसार समाजाने बहाल केलेली आहे. कुटुंबनायकांनी साधारणपणे कार्याध्यक्षांच्या सल्ल्याने व आदेशाने पंचायतीचे कामकाज करावयाचे आहे.

२) लेवा गाव पंच मंडळ :

अ) खान्देश व बुलढाणा परिसरातील मूळचे लेवा पाटीदार, लेवा कुणबी किंवा रेवा कुणबी म्हणून ओळखले जाणारे समाजाचे लोक मागील काही वर्षांच्या शैक्षणिक प्रगतीमुळे देशभर पसरलेले असून त्या त्या ठिकाणी मोठ्या संख्येने राहात आहेत. पंचायतीच्या भूमिकेस अनुसरून समाजाचे कार्य संघटितरित्या चालविण्यासाठी प्रत्येक गावात किंवा शहरात नियामक मंडळाच्या संमतीने लेवा गाव पंच मंडळ स्थापन करण्यात येईल. असे मंडळ स्थापन झाल्यानंतर त्यास नियामक मंडळाकडून कुटुंब नायक, कार्याध्यक्ष, कुलसचिव व अन्य पदाधिकाऱ्यांच्या सहीनिशी सदरच्या गावांत वा शहरात गाव पंच मंडळ निर्माण केल्याबाबतचा सनद वजा लेखी दाखला देण्यात येईल.

ब) गाव पंच मंडळ हे आपापल्या गावातील समाजाच्या कार्याकरिता जबाबदार असलेले महत्वाचे असे घटक मंडळ राहील. हे गाव पंच मंडळ त्या त्या गावाच्या क्रियाशील सभासदांमधूनच निवडण्यात येईल. त्या गावातील लेवा समाजाची लोकसंख्या लक्षात घेऊन नियामक मंडळ ठरविल त्याप्रमाणे कमीतकमी पाच व जास्तीत जास्त पंधरा सभासद ह्या मंडळात राहतील. असे गावपंच मंडळ ५०० लोकसंख्या असलेल्या गावात किंवा शहरात स्थापन करता येईल. ज्या गावात अगर शहरात ५०० लोकसंख्येपेक्षा कमी संख्या असेल, ते गाव अगर ते शहर नियामक मंडळ ठरविल त्याप्रमाणे दुसऱ्या गावांशी अगर शहराशी संलग्न करण्यात येईल.

क) गांव पंच मंडळास एक अध्यक्ष एक उपाध्यक्ष एक मानद सचिव आणि एक मानद सहसचिव असे पदाधिकारी राहतील.

ड) गाव पंच मंडळाची मुदत त्याच्या नियुक्तीच्या तारखेपासून जास्तीत जास्त ३ वर्षे पावेतो राहील. नवीन गावपंच मंडळाची रचना होईपर्यंत पूर्वीचे गाव पंच मंडळ कारभार चालविल.

२. १) गांव पंच मंडळाचे अधिकार व कर्तव्ये –

१) क्रियाशील कार्यकर्त्यांची वर्गणी स्वीकारणे व त्यांच्या सभासदत्वास मंजूरी देणे,

२) आपापल्या क्षेत्रात असणाऱ्या लेवा समाजातील लोकांचे प्रौढ कुमारिका, परित्यक्ता इ. चे पर्यवेक्षण करून नियामक मंडळाने ठरवून दिलेल्या नमुन्यात त्याची नोंद ठेवणे व प्रत कुटुंब नायकाकडे पाठविणे.

३) क्रियाशील कार्यकर्त्याकडून वर्गणी अगर देणगी आणि भोरगाव पंचायतीने ठरवून दिलेल्या रूपाने अगर अन्य रूपाने जमा झालेल्या रकमांपैकी ४० टक्के रक्कम भोरगाव पंचायतीकडे कुलसचिव यांच्या नावाने अदा करणे व त्याबाबत कुलसचिवांकडून पावती घेणे,

४) भोरगांव पंचायतीने सर्वसाधारण सभेमध्ये ठरविल्याप्रमाणे किंवा महामंडळाने अगर नियामक मंडळाने ठरवून दिलेल्या धोरणाप्रमाणे आपापल्या क्षेत्रात समाजाचे कार्य करणे व नियामक मंडळाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे,

५) आपापल्या गावांत अगर शहरात ज्या कोणी हुंडा न घेता अगर न देता विवाह केले असतील, त्यांचो पत्त्यासहित नोंद ठेवणे व त्याची एक प्रत भोरगाव पंचायतीकडे पाठविणे,

) सामुदायिक व कमीत कमी खर्चात विवाह होतील असा प्रयत्न करणे.

७ ) समाजातील विवाहेच्छू तरुण – तरुणींची तपशीलवार माहिती गोळा करून दप्तरी ठेवणे व त्याची एकेक प्रत भोरगाव पंचायतीकडे पाठविणे,

८ ) संस्थेच्या भूमिकेस अनुसरून व समाजाचा उत्कर्ष घडवून आणण्याच्या दृष्टीने पोषक असे कार्यक्रम घडवून समाजात जागृती निर्माण करणे,

९) समाज बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी कथा, कीर्तने, प्रवचने, व्याख्याने, स्वाध्याय मंडळ इत्या सारखे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम राबवून त्याद्वारा समाज मनावर संस्कार करणे,

१० ) समाजातील तरुण-तरुणींच्या आरोग्यासाठी व शरीर संवर्धनासाठी व्याख्याने, क्रीडामंडळे, योगासन केंद्रे, व्यायामशाळा, सकस आहार केंद्रे इ. उपक्रम राबविणे, या संदर्भात शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून आपल्या आरोग्यासंबंधीची जागृती समाजात निर्माण करणे,

११ ) समाजातील तरुण-तरुणींना व्यावसायिक मार्गदर्शन करणे व त्यांना मदत करणे,

१२ ) समाजातील निराधार, वृद्ध स्त्री पुरुषांना मदत करणे,

१३ ) एखाद्या व्यक्तीचा आपल्याच समाजातील दुसऱ्या एखाद्या व्यक्तीशी अगर दुसऱ्या समाजातील एखाद्या व्यक्तीशी वाद उपस्थित झाल्यास, त्यात मध्यस्थी करून प्रेमाने व सहकार्याने वाद मिटविण्याचा प्रयत्न करणे,

१४) आपापल्या क्षेत्रातील समाज बांधवांच्या कुटुंबियात वैवाहिक अगर अन्य कारणांवरून वाद उपस्थित झाल्यास त्याबाबत पुढाकार घेऊन त्यांच्यात सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. भोरगाव लेवा पंचायतीने घालून दिलेल्या संकेतांचे व मर्यादांचे एखाद्या सामान्य व आजीव सभासदाकडून उल्लंघन होत आहे असे आढळल्यास त्यास त्या मार्गांपासून समजुतदारपणे परावृत्त करण्याचा प्रयत्न करणे. असे करूनही ती व्यक्ती त्या मर्यादांचे उल्लंघन करीत आहे, असे आढळून आल्यास, लग्नकार्यात वा लग्नासारख्या कार्यप्रयोजनांत अशा व्यक्तीशी असहकार करणे यासारख्या मार्गांनी नापसंती व्यक्त करून त्यासंबंधीचा अहवाल महामंडळाकडे पाठविणे.

१५) वर नमूद केलेल्या कामाशिवाय जे जे काम समाजाच्या विकासाला पोषक होईल ते ते स्थानिक परिस्थितीनुसार हाती घेणे.

१६) समाज बांधवात भ्रातृभाव टिकून राहावा यासाठी त्या त्या गावातील गाव पंच मंडळाने आपल्या गावातील अगर शहरातील सर्व कुटुंबियांचे वर्षातून एकदा सम्मेलन घेणे, अशा सम्मेलन प्रसंगी समाजाच्या ध्येयधोरणाला व सद्भिरुचीला पोषक ठरतील असे विविध करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणे.

३ )लेवा पंचायत महामंडळ ।

लेवा पंचायत महामंडळाचे खालील प्रमाणे सभासद राहतील –

१ . ) प्रत्येक गांवपंच मंडळाचे अध्यक्ष व सचिव हे महामंडळाचे पदसिद्ध सभासद राहतील.

२ . ) ज्या गावात लेवा समाजाची पाचशे लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या आहे, अशा गावांत अध्यक्ष व सचिव यांच्या व्यतिरिक्त पाचशे वरील लोकसंख्येच्या प्रत्येक पाचशे लोकसंख्येस एक प्रतिनिधी याप्रमाणे महामंडळावर प्रतिनिधी पाठविण्यात येतील. या प्रतिनिधींची निवड ज्या त्या गांव पंच मंडळामधून केली जाईल.

ज्या गावांत पांचशेपेक्षा जास्त व एक हजारा पेक्षा कमी लोकसंख्या असेल, अशा गावातून सुद्धा प्रतिनिधी निवडण्यात येईल.

टीप- : वरीलप्रमाणे महामंडळावर ज्या त्या गावातून येणाऱ्या सभासदांपैकी त्या त्या गावातून कमीत कमी शेकडा २५ सामान्य स्त्री-सभासद असतील व ही अट कटाक्षाने पाळली जाईल, याशिवाय स्त्रियांचे प्रतिनिधित्व २५ टक्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचा प्रयत्न प्रत्येक गाव पंच मंडळाने करावा अशी अपेक्षा राहील. सदर २५ टक्के स्त्रियांचे राखीव सभासदत्व पुरुष सदस्यांकडून भरले जाणार नाही.

३) लेवा पंचायत महामंडळाची मुदत निवड जाहीर झाल्यापासून तीन वर्षेपावेतो राहील. मात्र नवीन महामंडळाची व पदाधिका यांची निवड जाहीर होईपर्यंत पूर्वीचेच महामंडळ व पदाधिकारी महामंडळाची कामे पाहतील

३.१). लेवा पंचायत-महामंडळाचे पदाधिकारी

अ) १) अध्यक्ष ( कुटुंब नामक हे पदसिद्ध अध्यक्ष राहतील )
२) कार्याध्यक्ष
३) उपाध्यक्ष
४) कोषाध्यक्ष
५) एक कुलसचिव
६) पाच सहकुलसचिव

ब) वरील पदाधिकाऱ्यांची निवड, निवड मंडळाकडून होईल व ती महामंडळाच्या सदस्यांमधून केली जाईल.

क) वरीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांची निवड करतांना समाजाच्या विस्ताराचे क्षेत्र व लोकसंख्या हे घटक निवड समिती लक्षात घेईलच पण त्याच बरोबर समाजाचे कार्य संघटितरीत्या चालू राहावे, व सर्व विभागांना प्रतिनिधित्व मिळावे ह्या दृष्टीने निवड मंडळ ह्याबाबत महामंडळाशीं सल्लामसलत करून निवड करण्याचा पायंडा पाडील.

३.२) महामंडळाचे अधिकार व कर्तव्ये :

क ) महामंडळाच्या सभासदांकडून नियामक मंडळाच्या सभासदांची निवड करणे.
ख ) भोरगाव लेवा पंचायतीच्या भूमिकेला अनुसरून तिच्या ध्येयधोरणाच्या पूर्ततेसाठी कार्यक्रम आखणे व समाजाच्या मार्गदर्शनासाठी स्वतंत्र नियमावली तयार करून ती प्रसिद्ध करणे.
ग) नियामक मंडळाने सादर केलेले जमाखर्चाचे हिशेब मंजूर करणे व पुढील वर्षाचे अंदाजपत्रक मंजूर करणे

घ) संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे अधिकार कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करून त्याबाबत नियमावली तयार करणे. त्या नियमावलीनुसार समाजाच्या कामकाजाचा वेळोवेळी अहवाल घेऊन तो मंजूर करणे.

४) लेवा पंचायत नियामक मंडळ

१) लेवा पंचायत मंडळाच्या सभासदांमधून ५१ सभासदांचे नियामक मंडळ निवडले जाईल.
२) लेवा पंचायत महामंडळाचे वर नमूद केलेले पदाधिकारी हेच नियामक मंडळाचे अनुक्रमे कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, कुलसचिव, कोषाध्यक्ष, सहकुलसचिव असे पदसिद्ध पदाधिकारी राहतील.

३) लेवा समाजाची वस्ती असलेल्या सर्व विभागांना नियामक मंडळावर प्रतिनिधित्व मिळावे या दृष्टीने नियामक मंडळाची निवडणूक घेण्याअगोदर निवड मंडळ हे महामंडळाच्या एकूण सदस्य संख्येस नियामक मंडळाच्या सदस्य संख्येने भागून ( त्यामधून पदाधिकाऱ्यांची संख्या वगळावी ) जो संख्या येईल, साधारणतः त्या संख्येइतका महामंडळावरील सदस्यांचा एक नियामक मंडळ मतदार संघ निश्चित करून तो जाहीर करील. अशा तऱ्हेने भागाकार करतांना

अपूर्णांक शिल्लक राहिल्यास तो लक्षात घेतला जाणार नाही. अशा नियामक मंडळ मतदार संघातून एक याप्रमाणे त्या त्या मतदार संघातील महामंडळाच्या सदस्यांमधून त्या त्या मतदारांस महामंडळाचे सदस्य एक याप्रमाणे प्रतिनिधी नियामक मंडळावर नियुक्त करतील.

४. १) नियामक मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :

क) लेवा पंचायत महामंडळाच्या आदेशानुसार वेळोवेळी समाजाचे कामकाज करणे.

ख) गांव लेवा पंच मंडळाला समाजाच्या कार्यासंबंधी वेळोवेळी मार्गदर्शन करणे व त्यांना कार्यतत्पर करणे.

ग) गाव पंच मंडळाकडून आलेल्या अहवालाचा विचार करून त्याबाबत निर्णय घेणे.

घ) गांव पंच मंडळाच्या निर्णयावरील अपीलाचा निकाल देणे.

च) सर्व साधारण समाजाच्या उन्नतीसाठी विविध प्रकारचे सामुदायिक कार्यक्रम आयोजित करणे

छ) भोरगाव पंचायतीच्या सभेपुढे चर्चेकरिता विषयपत्रिका तयार करवून ठरावाचे मसुदे तयार करणे.

ज) लेवा महामंडळापुढे चर्चेकरिता येणाऱ्या विषयाची विषय पत्रिका तयार करणे,

झ) लेवा महामंडळापुढे सादर करण्याकरिता समाजाचे हिशोब व अंदाजपत्रक तयार करणे .

ट) पंचायतीच्या दैनंदिन कामकाजावर पदाधिकाऱ्यामार्फत देखरेख ठेवून निधी गोळा करणे व निधी जमविण्याकरिता निरनिराळ्या प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणे

ठ) अंतर्गत हिशेब तपासणीसांची नेमणूक करून त्यांचा मोबदला ठरविणे.

ड) संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी पगारी कार्यालयीन चिटणीस व अन्य कर्मचारी नेमून त्यांचे वेतन व नोकरी संबंधीच्या अटी ठरविणे,

ढ) पर्यवेक्षणासाठी नमूना फार्म तयार करणे.

४. २) कार्याध्यक्षांचे अधिकार व कर्तव्ये:

क) कार्याध्यक्ष हे नियामक मंडळाचे, लेवा महामंडळाचे, भोरगाव पंचायतीच्या सर्वसाधारण व विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष राहतील.

ख) भोरगाव लेवा पंचायतीच्या भूमिकेस अनुसरून वेळोवेळी समाजाला मार्गदर्शन करणे व दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवणे.

४. ३ उपाध्यक्षांचे अधिकार व कर्तव्ये :

कार्याध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष हे कार्याध्यक्षांची कामे पाहतील.

४. ४) कोषाध्यक्ष

क) भोरगाव लेवा पंचायतीला मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या जंगम मिळकतीचा स्वीकार करून त्याबाबत पावती देणे,

ख, भोरगाव पंचायतीची आलेली रक्कम मान्यताप्राप्त अशा बँकेत जमा करणे व काढण्यास परवानगीदर्शक सह देणे. मात्र दैनंदिन खर्चाकरिता कोषाध्यक्ष यांना रक्कम रुपये १००० रोख हातात शिल्लक ठेवता येतील.

४. ५ कुलसचिव यांचे अधिकार व कर्तव्ये :

क) नियामक मंडळ व महामंडळ यांच्या ठरावाचीअंमलबजावणी करणे.

ख) दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवणे व कार्यालयीन चिटणीसाकडून सर्व तऱ्हेची दप्तरी कामे वेळोवेळी करवून घेणे.

ग) कार्याध्यक्षांच्या आदेशानुसार पंचायतीचे कामकाज करणे अथवा इतर पदाधिकाऱ्यांकडून कामकाज करवून घेणे

४. ६) सह-कुलसचिव यांचे अधिकार व कर्तव्ये :

१) कार्याध्यक्षांनी नेमून दिलेल्या विभागाच्या अंतर्गत असलेल्या समाजाला पोषक अशी सर्व तऱ्हेची वरील प्रमाणेची कामे करणे व सूचनेप्रमाणे आपापल्या विभागात काम करणे व आपल्या कामाचे अहवाल कुलसचिवांकडे पाठवणे.

२) आपापल्या विभागातील गाव पंच मंडळास जास्तीत जास्त भेटी देवून गाव पंच मंडळाला कार्यप्रवण ठेवणे व त्यांना मार्गदर्शन करणे.

४. ७) बँक अकाऊंट :

अ) भोरगाव लेवा पंचायतीचे नियामक मंडळ ठरविल अशा कोणत्याही मान्यताप्राप्त बँकेत कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष व कुलसचिव अशा संयुक्त नावाने खाते उघडण्यात येईल व जमा झालेल्या रकमा त्या बँकांच्या खात्यात ठेवण्यात येतील.

ब) सदरहू खात्यातून रकम काढण्याचा अधिकार खालीलप्रमाणे राहील. कोषाध्यक्ष आणि आणि कार्याध्यक्ष अथवा कुलसचिव ह्या दोघांपैकी एक अशा दोघांच्या सह्यांनी बँकेतून रकम काढता येईल किंवा बँकेच्या रकमेचा चेक देता येईल.

५ लेवा पंचायत निवड व सल्लागार मंडळ :

अ) भोरगाव लेवा पंचायतीच्या अंतर्गत असलेल्या विविध मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्याकरिता ३ सदस्यांचे स्वतंत्र निवड मंडळ राहील. कारण निवड होतांना तिला लोकशाहीचे अधिष्ठान तर लाभावे पण त्याचबरोबर या पध्दतीत येणारी कटुता मात्र टाळावी, यासाठी पंचायतीला मान्य होईल अशा तीन व्यक्तींची निवड करण्यासाठी भोरगाव पंचायतीच्या सर्वसाधारण सभेचा कौल घेण्यात येईल.

ब) निवड समितीवर निवडून आलेल्या कोणाही सदस्यास ते निवड व सल्लागार मंडळाचे सदस्य असे पर्यंत पंचायतीशी संबंधित असलेल्या कोणत्याही मंडळावर पदाधिकारी म्हणून राहता येणार नाही.

क) निवड मंडळातील तीन सदस्य आपल्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतील.

ड) निवड व सल्लागार समितीचे कार्य :

१) लेवा गाव पंच मंडळापासून ते लेवा पंच महामंडळापर्यंत तसेच लवाद मंडळ, महिला मंडळ युवक-युवती मंडळ वगैरे विविध मंडळावर पदाधिकाऱ्यांची निवड करणे. अशी निवड करतांना त्या त्या मंडळाच्या सदस्यांशी सल्ला - मसलत करून व त्या मंडळातील सदस्यांचा कल लक्षात घेऊन त्या त्या मंडळावर पदाधिकाऱ्यांची निवड करून ती जाहीर करणे.

२) अशातऱ्हेने निवड मंडळांकडून जाहीर करण्यात आलेले पदाधिकारी जाहीर झालेल्या तारखेपासून जास्तीत जास्त तीन वर्षेपावेतो त्या त्या मंडळावर पदाधिकारी म्हणून राहतील. परंतु मुदत संपल्यानंतर नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर होईपावेतो पूर्वीचेच पदाधिकारी त्या त्या मंडळाच्या कार्याची जबाबदारी सांभाळतील

३) भोरगाव पंचायत महामंडळ, नियामक मंडळ, गाव पंचमंडळ, आणि लवाद वगैरे इतर मंडळाशी आवश्यकतेनुसार विचार विनिमय करून मार्गदर्शन करणे.

४) निवड मंडळाची मुदत ही त्यांची नियुक्ती झाल्यापासून ३ वर्षेपावेतो राहील. पण नवीन मंडळाची निवड जाहीर होईपर्यंत पूर्वीचेच निवड मंडळ आपल्या कार्याची जबाबदारी सांभाळतील.

९) लेवा पंचायत विश्वस्त मंडळ --

अ) भोरगाव लेवा पंचायतीची सर्व स्थावर व जंगम मिळकत भोरगाव लेवा पंचायत, पाळधी या नावाने ट्रस्ट म्हणून नोंदण्यात येईल, सदर ट्रस्टचे खालीलप्रमाणे विश्वस्त राहतील.

१) कुटुंब नायक
२) कार्याध्यक्ष
३) उपाध्यक्ष
४) कोषाध्यक्ष
५) कुलसचिव
६) सहकुलसचिव

पंचायतीची सर्व मिळकत वरील विश्वस्तांचे नावाने ट्रस्ट म्हणून नोंदविण्यात येईल.

ब) विश्वस्त मंडळाच्यापैकी एखादा पदाधिकारी बदलल्यास त्याच्या ऐवजी नवीन पदाधिकाऱ्याचे नाव नोंदविण्यात येईल.

१० कार्यालय

कार्यालयीन चिटणीस —

क) भोरगाव पंचायत समितीचे दैनंदिन कार्यालयीन दप्तरी काम व हिशोबाचे कामकाज पाहण्याकरिता नियामक मंडळ एक पगारी कार्यालयीन चिटणीस व आवश्यकतेनुसार अन्य कर्मचारी नेमेल.

कार्यालयीन चिटणीसाच्या नोकरीच्या अटी व पगार नियामक मंडळ ठरविल.

ख ) कार्यालयीन चिटणीसांना कुटुंब नायक, कार्याध्यक्ष व कुलसचिव यांच्या देखरेखीखाली पंचायतीचे कामकाज करावे लागेल.

ग ) कार्यालयीन चिटणीसास दैनंदिन खर्चाकरिता रकम रुपये ५००/ हाताश शिल्लक ठेवता येईल.

घ ) पंचायतीचे सर्व हिशेब ठेवण्याची जबाबदारी कार्यालयीन चिटणीसांची राहील.

च ) कार्यालयीन चिटणीसांच्या मदतीकरिता आवश्यक असे कर्मचारी नेमण्याचा नियामक मंडळाला अधिकार राहील. अशा नेमलेल्या कर्मचारी वर्गाकडून कार्यालयाचे काम करवून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यालयीन चिटणीसावर व कुलसचिवावर राहील.

छ ) भोरगाव पंचायतीच्या महामंडळाच्या व नियामक मंडळाच्या सर्व सभांचे व बैठकींचे इतिवृत्त लिहिण्याची जबाबदारी कुलसचिवाच्या देखरेखीखाली कार्यालयीन चिटणीसावर राहील. परंतु असे इतिवृत्त लिहिल्यानंतर कुटुंब नायकांच्या, कार्याध्यक्षांच्या व कुलसचिवांच्या त्या इतिवृत्तावर सह्या राहतील.

११. भोरगाव लेवा पंचायतीच्या घटनेत दुरुस्ती

१) भोरगाव पंचायतीच्या सदर घटनेमध्ये दुरुस्ती करण्याचा सर्वस्वी अधिकार भोरगाव लेवा पंचायतीच्या सर्वसाधारण सभेला राहील.

२) भोरगाव लेवा पंचायतीच्या ध्येय-धोरणांच्या पूर्ततेसाठी व वर नमूद केलेल्या भूमिकेस पोषक अशी नियमावली तयार करण्याचा अधिकार भोरगाव लेवा पंच महामंडळाला व नियामक मंडळाला राहील. अशी नियमावली सर्व समाजास बंधनकारक राहील. भोरगाव लेवा पंचायतीच्या अंतर्गत असलेल्या विविध मंडळांनी व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी त्या नियमावलीनुसार कार्य करावयाची आहेत.

१२. संक्रमण काळातील तरतूद

अनेक वर्षानंतर भोरगाव लेवा पंचायतीचे पुनरुज्जीवन होत आहे. सदरहू घटना भोरगाव लेवा पंचायतीच्या १८ मार्च, १९८४ च्या सभेत मंजूर झालेली असल्यामुळे आज तारीख १८-३-१९८४ पासून ती अमलात येत आहे

या घटनेतील तरतूदीप्रमाणे विविध मंडळांची रचना होण्यास व त्यावरील पदाधिकारी निवडून येण्यात काही कालावधी लागणार आहे. सबब भोरगाव लेवा पंचायतीच्या आदेशानुसार प्रत्येक गावात व शहरात प्रथम लेवा गांव पंच मंडळ या मुलभूत घटक मंडळाची रचना झाल्यानंतर या घटनेत ल तरतुदीप्रमाणे महामंडळाची व नियामक मंडळाची रचना करण्यात येईल. अशा तऱ्हेने रचना करतांना घटनेत तरतूद केल्याप्रमाणे संघटना अस्तित्वात नसल्यामुळे विविध मंडळाची रचना व त्यांच्या पदाधिकाऱ्यांची नेमणूक हे सर्व भोरगांव पंचायतीने अधिकार दिलेल्या निवड व सल्लागार समितीने करावयाचे आहे. अशा तऱ्हेने निर्माण झालेल्या मंडळाची व पदाधिकाऱ्यांची जास्तीत जास्त मुदत १ वर्षाकरिता राहील. या १ वर्षामध्ये या घटनेत अभिप्रेत असल्याप्रमाणे संघटना तयार झाल्यावर या घटनेत नमूद केल्याप्रमाणे निवड मंडळाकडून विविध मंडळांची रचना करण्यात येईल व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येईल.